| MHKO070013602021 | **नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०२१ मधील**<br>**नि.क्र.८० वरील आदेश**<br>**(लक्ष्मण बाबू पाटील - विरुध्द - दादासो लक्ष्मण पाटील आणि इतर)** |
|---|---|

**०१.** वादी यांचे वारसांनी प्रस्तुतचा अर्ज वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांचे वारसांनी असे कथन केले आहे की, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा दाखल केलेला आहे. सदरचे काम प्रलंबित असताना यातील वादी लक्ष्मण बाबू पाटील हे ता.२६/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना पत्नी व एक मुलगा व दोन मुली असे सरळ कायदेशीर वारस आहेत. दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असुन वारसांना दावेचे काम चालवण्याचे आहे. वादीचे वारस हे अज्ञान असलेमुळे त्यांना कायद्याचे ज्ञान नसलेमुळे त्यांनी वादी हे मयत असलेबाबत वकीलांना वेळेत सांगीतले नाही. तसेच त्यांना कोर्ट प्रोसिजरची माहिती नसल्याने मुदतीत वारसांची तजवीज करता आली नाही. तद्नंतर प्रस्तुत कामासंदर्भात माहिती मिळाल्याने आजरोजी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज दाखल करत आहेत. सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेने सदर कामी अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदरचा झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत कामाचा पुर्णपणे गुणदोषावर निकाल होणार आहे. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असुन वादीचे वारसांना दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्क आहे. वादीचे वारस रेकॉर्डवर आलेस प्रतिवादी यांचे काही एक नुकसान होणार नाही. मात्र असे घडले नाही तर दावेचा पुर्णत: गुणदोषावर अंतिम निर्णय होणे कठीण आहे. सबब वादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला २१ दिवसांचा विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादीतर्फे वादीच्या वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेल्या विलंब माफीच्या अर्जास असे म्हणणे दिले आहे की, प्रस्तुतचे कामी यातील वादी लक्ष्मण बाबू पाटील हे दि.२६/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. सदर अर्जामध्ये वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब का झाला यांचे कोणतेही स्पष्ट कारण सदर अर्जामध्ये नमुद नाही. सदर अर्जामध्ये वादी यांचे वारसांना कायदयाचे ज्ञान नसलेचे तसेच ते अज्ञान असलेचे कारण हे पटनेसारखे नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा. अगर कोर्ट सदरचा अर्ज मंजुर करण्याच्या निर्णयास आलेस सदरच्या

अर्जास कॉस्ट करुन मंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी मयत वादी लक्ष्मण बाबू पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत निशाणी क्र.७८ सोबत दाखल केलेली आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन करता मयत वादी लक्ष्मण बाबू पाटील यांचा मृत्यू दि.२६/११/२०२४ रोजी झाल्याचे दिसुन येते. मयत वादी लक्ष्मण बाबू पाटील हे दि.२६/११/२०२४ रोजी मयत झाले तारखेपासून ९० दिवसांमध्ये मयत वादी लक्ष्मण बाबू पाटील यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतू वादीचे वारसांनी मयत वादी यांचे वारस त्यांच्या मृत्युनंतर ९० दिवसांत आणले नसल्यामुळे प्रस्तुतचा दावा अबेट झाला आहे. वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब दाखविण्यासाठी वादीचे वारस हे अज्ञान असलेमुळे त्यांना कायद्याचे ज्ञान नसलेमुळे त्यांनी वादी हे मयत असलेबाबत वकीलांना वेळेत सांगीतले नाही. तसेच त्यांना कोर्ट प्रोसिजरची माहिती नसल्याने मुदतीत वारसांची तजवीज करता आली नाही. यातील वादी यांनी हेतू पुरस्पर कोणताही विलंब केलेला नाही. त्यानंतर वादी यांनी दि.१९/०३/२०२५ रोजी सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केला. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचा महत्वपूर्ण हक्क नाकारल्यासारखे होईल. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते -

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज (नि.८०) चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मयत वादी लक्ष्मण बाबू पाटील यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब र.रु.१००/- (रुपये शंभर फक्त) न्यायालयात भरणेच्या अटीवर माफ करण्यात येतो.

VANITA Digitally signed by VANITA Date: 2025.06.10 16:44:17 +0530

**( व्ही.एम.कोळेकर )**

दि.०९/०६/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर.